# प्रकरण – 9

# निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये अवलंबली जाणारी पध्दत

महापालिका विश्लेषक प्रयोगशाळेतील निर्णय  प्रक्रिया

1. **नमुने प्राप्त करणे व नोंदी करणे.**

   विविध विभागाकडून, रुग्णालयांकडून, पाणीपुरवठा विभागाकडून, अन्न नमुनेकिंवा इतर तपासणीसाठी आलेले नमुने स्वीकारून त्यांची नोंद केली जाते.

2. **नमुना तपासणीसाठी वर्गीकरण**

   नमुन्याचे स्वरूप, प्रकार व तपासणीचे उदिष्ट लक्षात घेउन संबंधितविभागाकडे नमुना पाठविला जातो.

3. **वैज्ञानिक तपासणी व परीक्षण**

   निर्धारितनियम, मानके व प्रयोगशाळेतील प्रमाणित पध्दतीनुसार नमुन्यांची तपासणी केली जाते.

4. **मिळालेल्या निष्कर्षांचे परीक्षण**

   तपासणी अहवाल, मोजमापे, निरीक्षणे व तांत्रिक निष्कर्ष यांचे वरिष्ठ  अधिका-यांकडून परीक्षण केले जाते.

5. **नियम व मानकांशी तुलना**

   प्राप्त निष्कर्षांची शासननियम, कायदेशीर तरतुदी, आरोग्यनिकष व प्रयोगशाळा मानकांशी तुलना केली जाते.

6. **अंतिम निर्णय  घेणे**

   नमुना योग्य/अयोग्य/दूषित/निकृष्ट दर्जाचा/नियमबाहय असल्याचा निर्णय घेतला जातो.

7. **अहवाल तयार करून सादर करणे.**

   अंतिम निष्कर्षासह अधिकृत अहवाल तयार करून संबंधित विभागास पाठविला जातो.

8. **आवश्यक पुढील कार्यवाही सुचविणे.**

   दोष आढळल्यास दुरुस्ती, कारवाई, पुनर्तपासणी किंवा कायदेशीर उपाययोजना सुचविण्यात येतात.

## निर्णय प्रक्रियेची वैशिष्टये :

वस्तूनिष्ठ व वैज्ञानिक पध्दतीवर आधारित

नियमबध्द व पारदर्शक प्र क्रिया

अचूक माहितीवर आधारित निर्णय

सार्वजनिक आरोग्य व सुरक्षितेस प्राधान्य

वरिष्ठांच्या मान्यतेनंतर अंतिम निर्णय